लोकमत

# पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा सुरू

## ऑनलाईन पेपर : विद्यापीठाकडून १५ मेपर्यंत मुदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नित महाविद्यालयांमधील विविध अभ्यासक्रमांच्या पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा सोमवारपासून सुरू झाल्या. त्यासाठी एमसीक्यू स्वरूपातील २५ प्रश्नांचा ऑनलाईन पेपर होता. या परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाने महाविद्यालयांना दि. १५ मेपर्यंतची मुदत दिली आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील एकूण २७६ महाविद्यालये संलग्नित आहेत. विद्यापीठाने या महाविद्यालयांवर पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन स्वरूपात घेण्याची जबाबदारी सोपविली आहे. विद्यापीठाच्या सूचनांनुसार बहुतांश महाविद्यालयांनी सोमवारपासून या परीक्षांची सुरुवात केली. सकाळी नऊ ते सायंकाळी सहा यावेळेत प्रत्येकी एक तासाच्या विविध सत्रांमध्ये परीक्षा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या घरातून स्मार्टफोन, लॅपटॉप, टॅब, संगणक यापैकी एका माध्यमाचा वापर करून ऑनलाईन परीक्षा दिली. प्रीक्षांच्या नियोजनासाठी महाविद्यालयांनी त्यांच्या पातळीवर परीक्षा समिती गठित केली आहे. त्यामध्ये प्रत्येक विद्याशाखेतील एका प्राध्यापकांचा समावेश केला आहे. या समितीसह दोन कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून हेल्पलाईन कार्यान्वित केली आहे. एक-दोन विद्याशाखा असणाऱ्या काही महाविद्यालयांनी बुधवार (दि. ५) पासून परीक्षांची सुरुवात करण्याचे नियोजन केले आहे. त्यातील काही महाविद्यालयांमध्ये सोमवारी विद्यार्थ्यांची मॉक टेस्ट घेण्यात आली. दरम्यान, विद्यापीठाने विविध २५ अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा सोमवारी घेतली. त्यासाठी २९४३८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २८८१७ जणांनी ऑनलाईन परीक्षा दिली.

### लॉगीनला विलंब झाल्याने वेळ वाढविला

प्रथम वर्षाच्या परीक्षा पहिल्यांदाच ऑनलाईन पद्धतीने होत आहेत. त्यामुळे परीक्षा देण्यासाठी लॉगीन करण्यातील तांत्रिक अडचणीमुळे काही विद्यार्थ्यांना विलंब झाला. त्यांना वेळ वाढवून देण्यात आला. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्यांपैकी ज्या विद्यार्थ्यांनी लॉगीन केले नाही. त्यांच्याशी महाविद्यालयांतील परीक्षा समिती. हेल्पलाईनने संपर्क साधून त्यांची तांत्रिक अडचण दूर केली. या स्वरूपातील कार्यवाही न्यू कॉलेजमध्ये करण्यात आली.

# पदवी प्रथम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सोमवारपासून विद्यापीठातील अधिविभाग व संलग्रित महाविद्यालयामध्ये पदवी प्रथम वर्षाच्या ऑनलाईन परीक्षांना प्रारंभ झाला आहे.



कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने काही दिवसांपूर्वी विद्यापीठाने कार्यक्षेत्रातील संलग्रित २७६ महाविद्यालयांना पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत सूचना केल्या होत्या. बीए., बी.कॉम., बी.एस्सी., बीबीए, बीसीए, बीसीएस आदी २० हून अधिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा सोमवारपासून सुरळीतपणे सुरू झाल्या आहेत. ६५ हजारांहून अधिक विद्यार्थांचा यात समावेश आहे. काही महाविद्यालयांच्या परीक्षा ५ मेपासून सुरू होणार आहेत. १५ मेपर्यंत सर्व परीक्षा घेण्याच्या सूचना विद्यापीठाकडून करण्यात आल्या आहेत. महाविद्यालये विद्यापीठाच्या सॉफ्टेवअरमध्ये विद्यार्थ्यांचे गुण अपलोड करतील. विद्यार्थांच्या गुणांचे रुपांतरण करून निकाल जाहीर केला जाणार आहे.

# विद्यापीठातील शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरणास सुरुवात

**कौलव : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारतीसमोर असणाऱ्या अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा सुशोभिकरणाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कामास सुरुवात झाली आहे.

विद्यापीठातील शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसर करामाचा पहिला टप्पा गेल्या वर्षी पूर्ण झाला आहे. परिसरातील वॉकिंग ट्रॅकचे रुंदीकरण करण्यात आले आहे. लायटिंगचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गाच्या बाजूस नक्षीकाम केलेले घडीव दगड बसविण्यात आले आहेत. पुतळा सुशोभिकरण कामाबाबत कोल्हापूर शहर व जिल्हा नागरी कृती समितीसह विद्यार्थी संघटनांनी आक्षेप घेत कुलगुरूंना निवेदन दिले होते. पुतळा सुशोभिकरण कामास सुमारे ७० लाख रुपये खर्च येणार आहे. दुसऱ्या टप्प्यातील काम सध्या सुरू झाले आहे. त्यामध्ये बेसाल्ट खडकाचे रेलिंग, बगीचा विकासांतर्गत ठिबक सिंचन, स्प्रिंकलर उद्यानात बसविले जाणार आहे. विविध रंगाची आकर्षक फुले-झाडे लावण्यात येणार आहेत. येत्या सहा महिन्यांत शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरणाचे काम पूर्ण होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# २८ हजार विद्यार्थ्यांनी दिली विद्यापीठ ऑनलाईन परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे सुरू असलेल्या हिवाळी सत्र परीक्षांतर्गत सोमवारी २९ हजार ४३८ पैकी २८ हजार ८१७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२० च्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. सोमवारी बीएस्सी-बायोटेक, बीएस्सी-आयटी, बीएस्सी-शुगरटेक, बीएस्सी-फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बीसीएस, बीबीए, बीएसडब्ल्यू, बीएफटीम, बी.व्होक., बीए, बीएस्सी, एमए, एमएस्सी एम.लिब. आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. दरम्यान, परीक्षा विभागाच्या वतीने बीएस्सी, बी.व्होक. आदी २० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.


# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते संत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी.आर. पळसे, आयक्यूएसीचे संचालक डॉ. एम.एस. देशमुख, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण आदी उपस्थित होते.

सकाळ

# धर्मापेक्षा देशाचा अभिमान बाळगा

## डॉ. यशवंतराव थोरात; छत्रपती शिवरायांच्या इतिहासावर ऊहापोह






डॉ. यशवंतराव थोरात



डॉ. ज्ञानदेव तळुले

कोल्हापूर, ता. ३ : कोणत्याही विशिष्ट धर्मापेक्षा संपूर्ण देशाचा अभिमान महत्त्वाचा असतो. सतराव्या शतकात औरंगजेबाने हे ओळखले असते तर इतिहासाला एक वेगळे वळण मिळाले असते. पुढे भारतीय स्वातंत्र्याला फाळणीची झळही सोसावी लागली नसती, असे स्पष्ट मत 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. यशवंतराव थोरात यांनी व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, महाविद्यालय विकास समिती व 'आयक्यूएसी'च्या वतीने संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतिदिनानिमित्त आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. व्याख्यानमालेचे पहिले पुष्प त्यांनी गुंफले. 'छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब एक तुलनात्मक दृष्टिक्षेप' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य सरोज पाटील होत्या.

दरम्यान, संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्‌घाटन झाले. संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. थोरात यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब यांच्या चरित्रांची तुलनात्मक मांडणी केली. ते म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज माणूस म्हणून मोठे होते आणि म्हणूनच राजे म्हणूनही ते मोठे झाले. त्याउलट औरंगजेब माणूस म्हणून अपयशी ठरला. त्याने छत्रपती शिवाजी महाराजांशी द्वेष करण्यापेक्षा मैत्री केली असती तर इतिहासाला वेगळे वळण मिळाले असते." दुसरे पुष्प रविवारी शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तळुले यांनी गुंफले. 'कोविड-१९ चा ग्रामीण जीवनावरील परिणाम' या विषयावर त्यांनी संवाद साधला. कोरोनाची जगभरातली महामारी, गेल्या वर्षीचा पहिला लॉकडाउन, त्यानंतर आलेली दुसरी लाट आणि त्याचा 'लोकल टू ग्लोबल' परिणाम असा तौलनिक अभ्यास मांडताना त्यांनी ग्रामीण जीवनावर नेमके कोणते परिणाम झाले आहेत, याचा सर्वांगीण वेध घेतला. अध्यक्षस्थानी संस्थेच्या सहसचिव प्राचार्या डॉ. प्रतिभा गायकवाड होत्या. दरम्यान, बुधवार (ता. ५) पर्यंत व्याख्यानमाला सुरू राहणार असून सर्व व्याख्याने संस्थेच्या यू ट्यूब चॅनेलवर उपलब्ध असल्याचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, समन्वयक डॉ. एस. एम. साठे यांनी सांगितले.

Kolhapur, Main
04/05/2021 Page No. 5

सकाळ

# अध्यापन कौशल्यांचा विकास

## डॉ. पाटणकर; विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विभागाला १.२० कोटी



डॉ. पाटणकर

कोल्हापूर, ता. ३ : शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र अधिविभाग युरोपियन युनियनच्या इरॅस्मस प्लस अर्थसहाय्यित प्रकल्पात काम करीत आहे. 'मिटिगेट द इम्पॅक्ट ऑफ इंडस्ट्रियल रिव्हॅल्यूशन ऑन इंडियन सोसायटी : एज्युकेशन रिफॉर्म फॉर फ्युचर अँड इन सर्व्हिस स्कूल टीचस असे या प्रकल्पाचे नाव आहे. यासाठी शिक्षणशास्त्र अधिविभागाला १ कोटी २० लाखांचे अर्थसहाय्य दिले आहे, अशी माहिती प्रकल्प समन्वयक डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी दिली.

या प्रकल्पाचे मुख्य समन्वयक पंजाबमधील चित्कारा विद्यापीठ आहे. शिक्षणशास्त्र विभागासह इटली, लेविटिया, फिनलंड, जर्मनी या देशांतील विद्यापीठे व स्कूल भागीदार आहेत. विद्यार्थी, शिक्षक, प्रशिक्षक व सेवांतर्गत शिक्षकांत एकविसाव्या शतकातील कौशल्ये विकसित करणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.



शालेय विद्यार्थ्यांत चिकित्सक, पृथक्करण व सृजनशील विचार कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रशिक्षकांना तयार केले जाणार आहे. त्यासाठी विविध अध्यापनशास्त्रीय पद्धती, साधने व तंत्रे यांचा युरोपियन व भारतीय सहकाऱ्यांच्या सहाय्याने शोध घेणे. या अध्यापनशास्त्रीय पद्धतीचे भारतीय सामाजिक परिस्थितीत समायोजन व समवेशन होण्यासाठी शिक्षण प्रशिक्षणाच्या पदवी, पदव्युत्तर व पीएच.डी. स्तरावरील अभ्यासक्रमांत समावेश करून त्यानुसार शिक्षण देणे, सेवांतर्गत शिक्षकांना प्रशिक्षण देणे असे काम केले जाणार आहे. दोन्ही स्तरांवरील उद्देश साध्य होण्यासाठी सबलीकरण शिबिरांची मालिका देशामध्ये व युरोपियन देशांत आयोजित करण्याचीही तरतूद आहे. या प्रकल्पासाठी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर.के. कामत यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Kolhapur-Today
04/05/2021 Page No. 2

0 4 MAY 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूकंप लहरी मोजण्यासाठी अद्ययावत केंद्र






**कोयना-चांदोली भूकंपप्रवण क्षेत्रातील एखाद्या सूक्ष्म भूकंप लहरीचीही नोंद व भूगर्भातील बारीक-सारीक घडामोडींचा अचूक वेध घेण्यासाठी उदगिरी (तालुका शाहूवाडी) येथे दीड किलोमीटर खोल बोअरहोल मारून पूर्ण झाले आहे. भूगर्भात इतक्या खोलवर ड्रील खुदाई करून भूगर्भातील हालचालींची नोंद नॅशनल जिओफिजिकल रिसर्च इन्स्टिट्यूटच्यावतीने घेण्यात येते. उदगिरीच्या पठारावर सुरू होणारे हे बोअर होल सेंटर कोल्हापूर, सांगली, सातारा हे जिल्हे व चांदोली क्षेत्रातील भूगर्भीय हालचालींची माहिती मिळण्यासाठी मोलाचे केंद्र ठरणार आहे.**

**उदगिरी येथे उभारलेले अद्ययावत भूकंप लहरी मोजमाप केंद्र. या केंद्रातून भूगर्भातील हालचालींची बिनचूक माहिती उपलब्ध होणार आहे.**

सुधाकर काशीद
कोल्हापूर

मिनिस्ट्री ऑफ अर्थ सायन्सच्या अनुदानातून सुरू होणारे हे केंद्र केवळ एकच नसून कोयना, चांदोली क्षेत्रात अशी वेगवेगळ्या ठिकाणी आठ बोअर होल घेण्यात येणार आहेत. त्यापैकी पाच कार्यान्वित झाली आहेत. १९६७ साली कोयना भूकंपानंतर भूगर्भ शास्त्रज्ञांचे भूकंप व भूकंपलहरीच्या अनुषंगाने कोयना, चांदोली, पाटण भागावर लक्ष केंद्रित झाले. विविध पातळ्यांवर संशोधन सुरू करण्यात आले.

२०१५ साली नियमित यंत्रणेद्वारे झालेल्या अभ्यासात ०.५ व त्याहून जास्त क्षमतेचे १८४ भूकंपाचे धक्के नोंद झाले होते. मात्र बोअर होलमुळे जवळजवळ ८८८ अतिशय सूक्ष्म अशा भूकंपाचीही त्यात नोंद झाली. या बोअर होलमुळे भूकंपाचा नेमका केंद्रबिंदू, भूकंपलहरीची दिशा याचा अंदाज मिळतो. त्यामुळे या क्षेत्रात, ठिकाणी अशा बोअर होल केंद्राची उभारणी झाली आहे. भूगर्भात त्यासाठी बोअरिंगच्या धर्तीवर भोक पाडले जाते. अव्याहतपणे हे काम सुरू असते.

उदगिरी हा भाग दाट झाडीचा, डोंगरदऱ्याचा व प्रचंड पावसाचा आहे. तरीदेखील पठारावर खोदकामाचे दोन-तीन वर्षे काम सुरू होते. आता हे काम पूर्ण झाले आहे. त्या जागी छोटी इमारत बांधली गेली आहे.

अन्य तांत्रिक सोयीसुविधांचे काम सुरू आहे. कोल्हापूर जिल्ह्यात विज्ञानाच्या दृष्टीने उभारलेले हे आधुनिक केंद्र आहे. ते भूगर्भातील हालचालीची नोंद घेण्यासाठी खूप मोलाचे ठरणार आहे.

## निसर्गातल्या प्रत्येक घटकासाठी वरदान

अशा केंद्राची उभारणी भूकंपाचा केंद्रबिंदू व भूकंपलहरीची नेमकी दिशा कळण्यासाठी खूप महत्त्वाचा ठरतो. आपल्या जिल्ह्यात उदगिरी येथे उभारलेले हे केंद्र संशोधक, अभ्यासकांना खूप मोलाची मदत करणार आहे. हे काम खूप अभ्यासाचे आहे. लोकांना वर वर हे काय आहे हे नेमके कळणार नाही. पण हे केंद्र म्हणजे निसर्गातल्या प्रत्येक घटकासाठीचे एक वरदान आहे.

**डॉ. राजीव व्हटकर,**
**शिवाजी विद्यापीठ**